अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक आणि प्राचार्य या पदांच्या निवडीकरिता गठीत करावयाची समिती.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक वेतन-२०१८/प्र.क्र.५६/विशि-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १ जानेवारी,२०२४

वाचा :- 1. Government Resolution, Higher and Technical Education Department No. NGC-2009/(243/09)-Uni.1, dated 12th August, 2009.
2. Government of India MHRD letter No. 1-7/2015-U.II (1), dated 2nd November, 2017
3. Government of India MHRD letter No. Corrigendum F.No.1- 7/2015-U.II (1), dated 8th November, 2017.
4. UGC letter No. F.No.23-4/2017 (PS), dated 31st January, 2018
5. The Gazette of India: Extraordinary, Part III-Section 4, dated 18th July, 2018
6.The Maharashtra Public University Act, 2016
7. Government Resolution, Higher and Technical Education Department No. MISC-2018/C.R.56/18/UNI-1 dated 08 March, 2019 and 10th May,2019.
8. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१, दि.११ एप्रिल, २०२२.
9. संचालक,उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/संकिर्ण/मवि-१/२०२३/१६६२२ दि.२२ डिसेंबर,२०२३.

प्रस्तावना:-

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थामधील अध्यापकांकरिता दि. १८.०७.२०१८ च्या अधिसूचनेद्वारे शैक्षणिक अर्हता, पात्रता इत्यादी बाबी विहित करण्यात आल्या आहेत. सदर अर्हता, प्रात्रता आणि सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी राज्यातील अध्यापकांना दि.०८.०३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आल्या आहेत. उक्त दि.०८.०३.२०१९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.६.१ मध्ये महाविद्यालय/ संस्था यामधील सहायक प्राध्यापक आणि प्राचार्य या पदावरील निवडीकरिता पुढीलप्रमाणे निवडसमितीची तरतुद करण्यात आली असून ती पुढीलप्रमाणे आहे:- There shall be selection committee for recommending names of the suitable candidates for appointment for the post of Assistant Professor / College Principal. The selection committee shall be as per the guidelines prescribed by the State Government in the Official Gazette.

०२. अनुदानित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक आणि प्राचार्य यांच्या निवडीकरिता गठीत करावयाच्या समितीची रचना दि.१०.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. तसेच, राज्य शासनाने स्थापन केलेल्या, चालविलेल्या किंवा अनुदान दिलेल्या विवक्षित संस्थांमधील अध्यापक संवर्गातील पदभरती करताना पदे आरक्षित ठेवण्याची तरतुद महाराष्ट्र शैक्षणिक (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम,२०२१ अन्वये करण्यात आली आहे. त्या अन्वये विषयनिहाय आरक्षणाऐवजी संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्या संदर्भातील सविस्तर सुचना

दिनांक ७ एप्रिल,२०२२ ची अधिसुचना आणि दिनांक ११ एप्रिल,२०२२ च्या शासन निर्णयांन्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अनुदान मिळत असणारी महाविद्यालये एकाच व्यवस्थापनाच्या नियंत्रणाखाली असतील तर त्यांच्याकडील समान वेतनश्रेणीतील अध्यापक संवर्गाकरिता एक बिंदुनामावली ठेवण्यात येते.

०३. राज्यातील काही शिक्षण संस्थाची एकापेक्षा अधिक अनुदानित महाविद्यालये आहेत. तसेच अशी महाविदद्यालये विभिन्न विद्यापीठांशी संलग्नीत आहेत. अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षकीय पदांची भरती करताना दि.१०.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली निवड समिती, उपरोक्त अधिनियम आणि त्यान्वये देण्यात आलेल्या सुचना यांची एकत्रित अंमलबजावणी करण्यात येते. त्यानुसार एकाच शैक्षणिक संस्थेच्या विविध महाविद्यलयांमधील अध्यापकीय पदे भरण्याकरिता एकत्रित बिंदुनामावली आणि आरक्षण निश्चिती करुन घेण्यात येते. तसेच एकच निवड समिती गठीत करण्यात येते. अशा वेळी संस्थेच्या नियत्रंणाखालील महाविद्यालये भिन्न-भिन्न विद्यापीठाशी संलग्नित असल्यास नेमक्या कोणत्या विद्यापीठामधील/ महाविद्यालयामधील सदस्यांचा समावेश समितीमध्ये करावा याबद्दल संभ्रम निर्माण झाला होता. अशा परिस्थितीत अध्यापकांच्या निवडीकरिरता समितीची रचना विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यासंदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आाला आहे.

शासन निर्णय:-

राज्यातील काही शैक्षणिक संस्थाची एकापेक्षा अधिक अनुदानित महाविद्यालये आहेत. तसेच अशी महाविद्यालये भिन्न-भिन्न विद्यापीठांशी संलग्नीत आहेत. अशा संस्थांमधील प्राचार्य आणि सहायक प्राध्यापक या पदांच्या निवडीकरिता गठित करावयाच्या समितीची रचना खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे:-

अ) प्राचार्य निवड समिती:-

क्र	समिती सदस्य	सदस्य संख्या
१	Chairperson of the Governing Body of the colleges shall be the Chairperson of the committee.	१
२	Two members of the Governing Body of the colleges nominated by the Chairperson. Out of these two members one shall be an expert academic administration.	२
३	Two nominees of the Vice-Chancellor. Each Vice Chancellor of the concerned affiliating University shall recommend panel of five names of Higher Education Experts in the subject / field. The Chairperson of the governing body of the concerned colleges shall nominate two members from the panel recommended by the Vice Chancellors. Further these Education experts shall be from two different affiliating Universities. In case of colleges notified/declared as minority educational Institutions, two Education experts not connected with the University nominated by the Chairperson of the Governing Body of the College out of the panel of five names, preferably from the minority communities, recommended by Each Vice-Chancellor of the affiliating university from the list of subject experts approved by the relevant statutory body of the College.	२
४	Three higher education experts. Each Vice Chancellor of the concerned	३

	University shall recommend panel of six education experts, approved by statutory body. The Chairperson of the governing body shall nominate three members from the panel recommended by the Vice chancellor. These education experts shall be from Principal and Professor cadre. Further all education experts shall not be from a single affiliating University.	
५	An academician representing SC/ST/ OBC/Minority/ Women/Differently-abled categories if any candidate belongs to any of these categories and the selection committee does not comprises any member of above category. Vice-Chancellor of each university shall recommend a name of a person. The Chairperson shall nominate a member from the persons recommended by Vice-Chancellors.	१
६	Two subject experts. Each Vice-Chancellor of the concerned affiliating University shall recommend panel of five names approved by relevant statutory body. The Chairperson of the Governing body of the concerned colleges shall nominate two members from the panel recommended by Vice-Chancellors. Further, these subject expert shall be from two different Universities. In case of colleges notified/declared as minority educational Institutions, two subject experts not connected with the University nominated by the Chairperson of the Governing Body of the College out of the panel of five names, preferably from the minority communities, recommended by Each Vice-Chancellor of the affiliating university from the list of subject experts approved by the relevant statutory body of the College.	२
७	The Director, Higher Education or his nominee not below the rank of Professor/Principal, in Case of post is on grant-in-aid basis;	१

The quorum for the meeting shall be five members, of whom at least two shall be from out of three experts and Director, Higher Education or his/her nominee.

ब) सहायक प्राध्यापक निवड समिती:-

क्र	समिती सदस्य	सदस्य संख्या
१	Chairperson of the Governing Body of the colleges or his / her nominee from amongst the members of the Governing body, shall be the Chairperson of the Committee.	१
२	A Principal, nominated by the Chairperson of the governing body of the colleges from amongst the principals of colleges under the management.	१
३	A Head of the Department or a teacher in-charge of the subject concerned of the concerned colleges under the management. He shall be nominated by the Chairperson of governing body of the colleges.	१
४	Two nominees of the Vice-Chancellors of the concerned universities. Each Vice-Chancellor shall recommend panel of two nominees, of which one shall be a subject expert. The chairperson shall nominate two members from the panel recommended by the Vice-Chancellors. These members shall be from two different affiliating Universities. Further, one of the member shall be a subject expert. In case of colleges notified/ declared as a minority educational institution, two	२

	nominees of the Chairperson of the college from out of a panel of five names, preferably from the minority community, recommended by the each Vice-Chancellor of the affiliating university, from the list of experts suggested by the relevant statutory body of the college, of whom one should be a subject expert.	
५	Two subject experts. Each Vice-Chancellor of the concerned Affiliating University shall recommend panel of five names approved by relevant statutory body. These subject expert shall be from the colleges other than the colleges under the management. The Chair person of the Governing body of the concerned colleges shall nominate two members from the panel recommended by Vice-Chancellors. Further, these subject expert shall be from two different Universities. In case of colleges notified/declared as minority educational Institutions, two subject experts not connected with the University nominated by the Chairperson of the Governing Body of the College out of the panel of five names, preferably from the minority communities, recommended by Each Vice-Chancellor of the affiliating university from the list of subject experts approved by the relevant statutory body of the College.	२
६	An academician representing SC/ST/ OBC/Minority/ Women/Differently-abled categories. if any candidate belongs to any of these categories and the selection committee does not comprises any member of above category. Vice-Chancellor of each university shall recommend a name of a person. The Chairperson shall nominate a member from the persons recommended by Vice-Chancellors.	२
७	A Joint Director, Higher Education of the region or his nominee not below the rank of Associate Professor, if the post is on grant-in aid basis.	१

The quorum for the meeting shall be five members, of whom at least two shall be from out of three subject expert and Joint Director, Higher Education or his/her nominee.

०४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०१०११६०९४५२९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT DATTATRAYA KATKAR

Digitally signed by AJIT DATTATRAYA KATKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=6ab66d3253a5332c701bb9922697b252de2300d3e9cfe0b93c88e8c299b219a8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1DAE81E2CCBD6C60BC3D691080DEA5E5428071B91ADE593F8D918786037CB6A1, cn=AJIT DATTATRAYA KATKAR
Date: 2024.01.01 16:40:41 +05'30'

(अजित काटकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
३) सर्व कुलसचिव, अकृषि विद्यापीठे,
४) मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव,
५) निवड नस्ती, कार्यासन विशि-१